नवराष्ट्र
www.navarashtra.com

# कारंजा येथे जनसुरक्षा शिबिर

## परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**वाशिम,** ब्युरो. स्टेट बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे अध्यक्षपद प्रादेशिक संचालक रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर सचिन वाय. शेंडे यांनी भूषविले होते.

याप्रसंगी उपमहाप्रबंधक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक स्टेट बँक ऑफ इंडिया अमरावती शशी रंजन, क्षेत्रीय व्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया अकोला आशिष कुमार सिंह, उपमहाप्रबंधक स्टेट बँक ऑफ इंडिया किसले कुमार आदी उपस्थित होते. विविध ग्रामपंचायतींमधून दोनशेहून अधिक नागरिकांनी हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे यांनी नागरिकांना बँक खात्याची केयसी पूर्ण करून प्रधानमंत्री सुरक्षा विमा व जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक शशी रंजन यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे अटल पेन्शन योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याने राज्यात प्रथम स्थान मिळविल्याची गौरवाची नोंद केली.

washim-buldhana plus Edition
Aug 23, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com